नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १५/१०/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत चक्कीघाट हेटी शिवार व्ही आय टी कॉलेज जवळ येथे दिनांक १३/१०/२२ चे २०.०० वा. सुमारास एमएच– ४९/बीबी– ४५५७ क्रमांकाचा इनोव्हा कारचा चालक प्रशांत प्रकाश खरात(मृतक), वय ४१ वर्ष, रा.घर क्र. ३७७ नाईक रोड, उचकेखडु कारखाना महाल, नागपुर चालक हा उमरेड शहरातुन नागपुर कडे सोबत प्रवाशी घेवुन जात असतांना एमएच– ३१/सीक्यु– ३०६९ क्रमांकाच्या ट्रक ट्रेलर गाडीचे मागील टायर फुटुन बंद पडलेला गाडीच्या चालक आरोपी नामे– परविंदर सिंग बलदेवसींग सैनी वय ५८ वर्ष, रा.धनलक्ष्मी सोसा अर्बन प्लॉट नं ९६० विनोबा भावे नगर, नागपुर याने निष्काळजीपणे वाहन रोडाचे मध्ये उभा करून कोणतीही उपाययोजना न केल्याने कार चालक याचा ट्रकला धडकुन मृत्यु झाली. तसेच कार मधील बसेल्या प्रवाशी लोकांना जखमी करण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार आषिश खोडे पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २८३, ३३७, ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि खोब्रागडे मो.क्र. ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील गुमथी सावरमेडा शिवार येथे दिनांक १४/१०/२२ चे २३.०० ते १५/१०/२२ चे ०६.०० वा. सुमारास एमएच– ४०/बीआर– १७०८ क्रमांकाचा मोटरसायकल चा चालक आरोपी नामे– संतोष रामप्रसाद परीहार(मृतक) वय ३४ वर्ष, रा. गुमथी याने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन चिंचेच्या झाडाला स्वता धडक मारली. ज्यामुळे त्याच्या डोक्याला,पायाला,चेहरयाला,हाताला गंभीर जख्समी होवुन तो जागीच मरण पावला. तो आपल्या मरणास स्वता कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हंसराज डालचंद भिसे, वय ४० वर्ष, रा. गुमथी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३०४(अ),१८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गुरुप्रकाश मेश्राम हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**